Kasegaon Education Society's,

Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar.

Central Library



वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत काव्यवाचन कार्यक्रम दि. १७ जानेवारी २०२५

आयोजक
आर.आय. टी. मध्यवर्ती ग्रंथालय टीम

अहवाल

दिनांक : १७ जानेवारी २०२५
ठिकाण : आर.आय. टी. महाविद्यालय
लाभार्थी नं. : 125
लाभार्थी: प्राध्यापक, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी
समन्वयक : सौ. स्वाती केखलेकर आणि
सर्व ग्रंथालय कर्मचारी



प्रस्तावना

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमा अंतर्गत साहित्यप्रेम, भावनिक अभिव्यक्ती आणि सृजनशीलतेचा उत्सव साजरा करण्यासाठी **राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि च्या मध्यवर्ती ग्रंथालया** च्या वतीने **काव्यवाचन कार्यक्रमाचे** आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे विविध कवींनी आणि साहित्यप्रेमींनी आपल्या प्रतिभेच्या माध्यमातून रसिकांना साहित्याचा आस्वाद देणे. कार्यक्रमाने श्रोत्यांवर एक अद्वितीय आणि प्रेरणादायी प्रभाव टाकला.

उपक्रमाविषयी

प्राध्यापक, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मध्ये साहित्याची गोडी वाढवण्यासाठी आणि आपल्या संस्कृतीला साजेसे कवितांचे सादरीकरण करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला गेला. वाचनाची आवड वाढवण्यासाठी आणि साहित्याची गोडी जोपासण्यासाठी तसेच प्रभावी वाचन कौशल्य, अभिव्यक्ती आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी, श्रोत्यांशी संवाद साधण्याची कला या सर्वासाठी हा कार्यक्रम विशेष उपयुक्त ठरला.

उपक्रमाची उद्दिष्ट्ये

१. शिक्षकेत्तर कर्मचायांच्या मध्ये आत्मविश्वास वाढवणे.
२. ग्रंथालयाचा वाचक वर्ग वाढवणे.
३. ग्रंथालयातील वाचन साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविणे.
४. काव्यवाचनाच्या माध्यमातून श्रोत्यांना आनंद मिळवून देणे.
५. मराठी भाषेतील साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन करणे.

Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY
K.E.S.

सारांश

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रकाश जाधव आणि अध्यक्ष म्हणून सौ. सारिका पाटील उपस्थित होते. उद्घाटन सत्रात सरस्वती आणि लोकनेते राजारामबापू पाटील याच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची प्रास्ताविक आणि सूत्र संचालन श्री. संदीप चव्हाण यांनी केले. अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे यांनी सुंदर मनोगत व्यक्त केले आणि या उपक्रमाचे कौतुक केले.

काव्यवाचन सत्र:

यानंतर संदीप चव्हाण यांनी काव्यवाचन सत्राची सूत्रे सौ. स्वाती केखलेकर, श्री. मंगेश डांगे आणि सौ. उज्वला पवार यांच्याकडे सुपूर्द केली. कार्यक्रमा मध्ये लोकप्रिय कवी कुसुमाग्रज, सुरेश भट, संकर्षण कऱ्हाडे, सौमित्र, सौरभ रामाधून, गुरु ठाकूर इ. कवींच्या अनेकविध विषयावरच्या विविध आशयाच्या कविता सादर केल्या. कवितांच्या सादरीकरणादरम्यान विविध कवींनी त्यांच्या शैलीतून जीवन, निसर्ग, प्रेम, समाज आणि मानवी भावनांचा सुंदर आविष्कार सादर केला. काही कवितांनी श्रोत्यांच्या डोळ्यांत पाणी आणले, तर काहींनी हास्याची कारंजी उडवली.

रोजच्या रुटीन कामांमधून थोडासा विरंगुळा म्हणून सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. जवळपास २७ स्टाफ ने कार्यक्रमात सहभागी होऊन काव्य वाचन केले. काहींनी आपल्याला आवडणाऱ्या कविता सादर केल्या तर काहींनी स्वरचित कविता सादर केल्या. कार्यक्रमा मध्ये काही काव्य रसिकांनी उत्स्फूर्त कविता सादर केल्या. रसिकांनी टाळ्यांच्या गजरात कवितांना दिलखुलास दाद दिली.

काव्य रसिकांनी खूप चांगले अभिप्राय नोंदविले, अश्याच प्रकारचे कार्यक्रम वारंवार आयोजित करावेत तसेच आमचा आजचा दिवस आनंदात गेला, जीवन कडे बघण्याचा आमचा दृष्टिकोन बदलला अश्या प्रकारचे अभिप्राय सदर कार्यक्रमास मिळाले.

महाविद्यालयाचे संचालक आदरणीय डॉ. पी. व्ही. कडोले यांनी ग्रंथालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करून उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY

रजिस्ट्रार सौ. सारिका पाटील यांनी ग्रंथालयाने आयोजित केलेल्या या नवीन उपक्रमाचे खूप कौतुक केले.

महाविद्यालयाचे सर्व डीन, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी उपक्रमाचे कौतुक केले.

अश्या प्रकारचे विविध उपक्रम करण्यासाठी कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव आदरणीय आर. डी. सावंत, महाविद्यालयाचे संचालक आदरणीय डॉ. पी. व्ही. कडोले यांचे आम्हास नेहमीच मार्गदर्शन आणि सहकार्य असते ते याहीवेळी मिळाले त्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

सदर उपक्रमास ग्रंथपाल प्रा विश्वास हासे यांचे मार्गदर्शन लाभले व सर्व ग्रंथालय सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे उत्कृष्ट संयोजन केले .

समन्वयक	ग्रंथपाल	संचालक
सौ. स्वाती केखलेकर	प्रा. व्ही. एल. हासे.	प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले.

K.E.S. Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY

Participants Feedback



K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- Pooja Ashok Dewi
Roll No. E0032
Feedback: -
कार्यक्रम खूप छान होता. असे कार्यक्रम वारंवार आयोजित करावे. या कार्यक्रमामुळे आपल्या आजूबाजूचे लपलेले प्रतिभावान कवी, लेखक यांची ओळख होते. धन्यवाद.
Sign

K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- Rajendra Sharan Sangar
Roll No. E0033
Feedback: -
या कार्यक्रमामुळे आपल्यातील अनेकांना कवितेची आवड निर्माण होण्यास मदत होते. तसेच कवितेचे आपल्या जीवनातील महत्त्व अधोरेखित होते.
Sign

K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- Mrs Sunil Yashwant Jadhav
Roll No. E0035
Feedback: - खूप छान workshop होते
मी शिकले होते मला.
मराठी ... मराठी बद्दल अजून गोडी निर्माण झाली.
Thank you
Sign

K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- Vishal Bhaskarrao Khot
Roll No. E0042
Feedback: -
कार्यक्रमाचे नियोजन उत्तम असून खूप छान. सर्वांनी खूप चांगला प्रतिसाद दिला व सहभाग घेतला.
Sign



K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- Ganesh Bhagwan Koli
Emp ID. E0105
Feedback: - आम्ही आमच्या महाविद्यालयात अनेक वेळा वेगवेगळे कार्यक्रम केले परंतु आमच्या सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कवितेची आवड निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम घेणे ही काळाची गरज आहे. आपण हा कार्यक्रम घेतलात त्याबद्दल आपले मनापासून धन्यवाद.
Sign

K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- Dr Rajaram R. Jadhav
Emp ID. E0021
Feedback: - विविध प्रकारच्या कविता ऐकण्याचा आनंद घेता आला. कवितेचे आकलन होण्यास मदत झाली.
कविता सादरीकरणाची शैलीसुद्धा खूप छान होती. वेगवेगळ्या कवींच्या कविता ऐकण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.
Sign

K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- शिवाजी भगवान जाधव
Roll No. E0134
Feedback: - आजचा दिवस खूपच छान होता. कविता ऐकण्याचा आनंद खूप मोठा होता. असे कार्यक्रम नेहमी व्हावेत.
Sign

K.E.S.
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
Central Library
"Kavya Vachan Karyakram" on 17th January 2025

Name:- विकास विलास जाधव
Emp ID. E0163
Feedback: - आजच्या ऑनलाइन कार्यक्रमाचे कार्य नियोजन सर्वच अभ्यासपूर्ण होता. कार्यक्रमाचे संचालन करणाऱ्या प्राध्यापिका यांचा या सारा प्रकारचा उपक्रम सर्वांना मार्गदर्शक ठरेल.
Sign

Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY
K.E.S.

ACTIVITY GLIMPSES

K.E.S. Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY

K.E.S. Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY

K.E.S. Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY